॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

## अध्याय सतरावा

### भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

नमस्कार,

श्रीगुरुचरित्रातील ओव्यांचा योग्य अर्थ प्रयत्न :-

वाचकांनी समर्पक मते कारणमीमांसेसहित

pratisaadasg@gmail.com वर

आपल्या नाव पत्त्यासहीत कळवावीत ही विनंती.

कळावे,

‘श्रीगुरुचरित्र आशय – निधी’

ओवी क्रमांक : ५८

## अध्याय सतरावा

## भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

### ओवी क्रमांक ५८

चिंतामणि-संपर्केसीं। सुवर्ण होय लोह कैसी।
मृत्तिका पडतां जांबूनदीसी। सुवर्ण होय जेवीं देखा॥५८॥

ह्या ओवीतील जांबूनदी ह्या शब्दाच्या अर्थापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न :-

शब्दकोशातील अर्थानुसार,

जांबू(बु)नद (संस्कृत) = सोन्याचे तसेच सोने

शब्द, व्याकरण ह्या बाबतीत काटेकोर असणारे, श्रीगुरुचरित्रकार 'जांबूनद' असा शब्द न वापरता 'जांबूनदीसी' असे म्हणतात.

ह्या ओवीचा शब्दशः अर्थ :-

माती जांबूनदीत पडली असता, तिचे सोने होते, हे आपण पहातो.

'जांबूनदी' ह्या शब्दाचा पुष्कळ ठिकाणी 'जम्मू नदी' असा अर्थ सांगितलेला आढळतो.

'जम्मू' हा भारतातील प्रदेश असून, तेथे जम्मू नावाची नदी नकाशात आढळत नाही.

॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

## अध्याय सतरावा

## भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

जम्मू-काश्मीर ह्या प्रदेशातून वाहणाऱ्या नद्यांची नावे :-

झेलम, सिंधू ,चेनाब, किशन गंगा, तावी व रावी

वरील नद्यांपैकी तावी नदी जम्मू मधून वहाते.

(Ref : http://jkenvis.nic.in/water_resources_introduction.html)

मातीचे सोन्यात रुपांतर होणे ही घटना आपण पहातो असे श्रीगुरुचरित्रकार म्हणतात. ह्याचा अर्थ माणसाच्या दशक्रिया विधीत, त्या मृत व्यक्तीची रक्षा (राख) रामकुंड नाशिक, रामटेक नागपूर इत्यादी ठिकाणी पाण्याच्या प्रवाहात सोडून त्या आत्म्याला मुक्ती मिळते, अशी श्रद्धा आहे म्हणजे त्या राखेचे (मातीचे) सोने होते, असे श्रीगुरुचरित्रकारांना सूचित करावयाचे असावे.

ओवी क्रमांक ५८ चे गद्यरुप पुढीलप्रमाणे असावे, असे वाटते.

### गद्यरुप :-

चिंतामणिच्या संपर्कात लोखंडाचे सोन्यात रुपांतर कसे होत असेल ? पाणी उत्पन्न करणाऱ्या नदीत माती टाकली असता, तिचे (मातीचे) सोने होते (त्या मातीला मुक्ति मिळते), हे ज्याप्रमाणे आपण पहातो.

॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

# अध्याय सतरावा

## भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

### शब्दार्थ :-

<table>
<tr><td colspan="6">चिंतामणि= इच्छिलेले देणारा मणि (काल्पनिक मणि), गणपती</td></tr>
<tr><td colspan="2">सुवर्ण= तेजस्वी</td><td colspan="2">लोह= लोखंड</td><td colspan="2">कैसा =कसा?</td></tr>
<tr><td colspan="3">मृत्तिका=माती</td><td colspan="3">जेवी= ज्याप्रमाणे</td></tr>
<tr><td colspan="6">जांबूनदी= ज (उत्पन्न झालेला) + अंबू (पाणी) + नदी</td></tr>
</table>

{ टीप:- लोकसंख्या वाढत असताना, पृथ्वीवरील पाण्याची पातळी मर्यादित आहे. त्यामुळे दशक्रिया विधी नदी पात्रात करावा का ?, ह्याचा समाजाने विचार करणे गरजेचे आहे. }

अध्याय क्रमांक १७ मध्ये श्रीगुरुचरित्रकार सांगतात, भिल्लवडीला श्रीगुरु (श्रीनृसिंह सरस्वती) ४ महिने रहात असलेले ठिकाण कोणालाही माहित नव्हते; तसेच अनुष्ठानाचे प्रवर्तक असलेले श्रीगुरु ४ महिने गुप्त रुपांत रहात होते. (ओवी क्रमांक ५).

श्रीगुरुंचे वास्तव्य असलेले भिल्लवडी येथील ठिकाण समजण्यास कठीण आहे. (ओवी क्रमांक ६)

# अध्याय सतरावा

## भिल्लवडीस्थानमहिमावर्णन - मंदमतिब्राह्मणवरप्रदान

ह्या संदर्भांवरुन श्रीगुरुंच्या भिल्लवडी येथील वास्तव्याची निश्चित माहिती सिद्धमुनींकडे नसावी, असे दिसते.

कोल्हापूरवासीय अल्पस्मृती (Short Memory)असलेल्या मुलाच्या डोक्यावर श्रीगुरुंनी प्रसन्न होऊन हात ठेवताच, त्याला ज्ञानप्राप्ती झाली. (ओवी क्रमांक ५५)

ह्या गोष्टीचा अर्थ शिवपुराणात सांगितलेली शक्तीपात - दीक्षा (कुंडलिनी जागृती) असा मानला जातो.

{ संदर्भ :- 'श्रीगुरुचरित्रकथामृत' – संपादक - कृष्णभक्त दिवाकर अनंत घैसास
केशव भिकाजी ढवळे, प्रकाशन मुंबई }

आजही समाजात जन्मतः तसेच आजाराने, अपघाताने अल्पस्मृतीचा आजार (Short Memory)असणाऱ्या व्यक्ती आढळतात. योगमार्गातील [शिवपुराणात सांगितलेली शक्तीपात - दीक्षा (कुंडलिनी जागृती)] उपचारावर, शास्त्रीय संशोधन झाल्यास, श्रीगुरुचरित्रातील अमृत अल्पस्मृती (Short Memory)आजारावरील रामबाण उपाय जगाला देईल.

॥ ॐ श्रीगुरुदेवदत्त ॥